**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार, दिनांक २४ सप्टेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

- **विदर्भातील भाजपची संघटनात्मक, कार्यकर्ता संवाद बैठक आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत संपन्न.**
- **राज्यातील तीर्थक्षेत्र विकासाच्या सुमारे 305 कोटी 63 लाख रुपयांच्या आराखड्यांना मंजुरी, संत गाडगेबाबा यांची कर्मभूमी 'ऋणमोचन' इथल्या 18 कोटींच्या विकास आराखड्यास मान्यता.**
- **'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेत विदर्भात केवळ तीन महिन्यात 3 हजार 541 शेतकऱ्यांच्या शेतात सौर कृषी पंप.**
- **विश्रांतीनंतर नागपुरात पावसाचं पुनरागमन, आज पूर्व तर उद्या पश्चिम विदर्भात मुसळधार पावसाची शक्यता; उद्या वाशिम जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी.**

****

अमित शाह

विदर्भातील भाजपची संघटनात्मक, कार्यकर्ता संवाद बैठक आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत नागपुरातील कविवर्य सुरेश भट सभागृहात पार पडली. विदर्भातील अकरा जिल्ह्यातील मतदारसंघाचा आढावा घेत आगामी निवडणुकीसाठी शाह यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. या बैठकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, माजी मंत्री रावसाहेब दानवे, माजी मंत्री हंसराज अहिर तसंच भाजपचे विधानसभा निवडणूक राज्य प्रभारी भूपेंद्र यादव उपस्थित होते. आज अमित शाह संभाजीनगर इथं देखील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधणार असून उद्या ते नाशिक इथं उत्तर महाराष्ट्र तर कोल्हापूर इथं पश्चिम महाराष्ट्रातील बैठकीतही सहभागी होतील.

ओम बिर्ला/ॲड. राहुल नार्वेकर

विधानमंडळांची कार्यक्षमता आणि कामकाज सुधारण्यासाठी तंत्रज्ञानाच्या वापरावर भर द्यायला हवा, असं मत लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी व्यक्त केलं आहे.

राष्ट्रकुल देशांमधल्या लोकप्रतिनिधी गृहांच्या संघटनांचं १० वं संमेलन नवी दिल्लीत भरलं आहे. त्यात ते बोलत होते. या संमेलनात महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर आणि विधानपरिषद उप सभापती डॉ.नीलम गोऱ्हे देखील उपस्थित आहेत. शाश्वत विकास उद्दिष्टपूर्ती बरोबरच भारताला अखिल विश्वातील समृध्द आणि विकसित राष्ट्र बनविण्यासाठी महाराष्ट्राचे योगदान सर्वाधिक महत्वाचे ठरत आहे, असं प्रतिपादन आपल्या भाषणात नार्वेकर यांनी केलं. "शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासासंदर्भात विधानमंडळांची भूमिका" या विषयावर ही दोन दिवसीय परिषद आयोजित करण्यात आली आहे.

तीर्थक्षेत्र विकस

राज्यातील विविध तीर्थक्षेत्र विकासाच्या सुमारे 305 कोटी 63 लाख रुपयांच्या आराखड्यांना आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली. यात श्री क्षेत्र पंढरपूर इथल्या दर्शन मंडप आणि दर्शन रांग या सुविधेसाठी 129 कोटी 49 लाख रुपयांच्या कामांचाही समावेश आहे. ग्रामविकास विभागानं सादर केलेल्या अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर इथल्या संत गाडगेबाबा यांची कर्मभूमी 'ऋणमोचन' इथं 18 कोटींच्या विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली. याशिवाय नागपूर शहरातील नंदनवनच्या लक्ष्मीनारायण शिवमंदिरासाठी 24 कोटी 73 लाखांच्या विकास आराखड्यास, शांतीनगर मधील कुत्तेवालेबाबा मंदिर आश्रमासाठी 13 कोटी 35 लाख रुपये आणि पारडी विकास आराखड्यामधील मुरलीधर मंदिरासाठी 14 कोटी 39 लाख रुपयांच्या तरतूदीस मान्यता देण्यात आली आहे. तीर्थस्थळ आणि पर्यटनस्थळांच्या विकासासाठी तातडीनं नियोजन करण्यात यावं, तेथील कामे दर्जेदार आणि गूणवत्तापूर्ण व्हावीत याची काळजी घ्यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री शिंदे यांनी या बैठकीत दिले.

गळीत हंगाम

राज्यातल्या साखर कारखान्यांचा ऊस गळीत हंगाम येत्या १५ नोव्हेंबरपासून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे; त्यानुसार साखर कारखान्यांनी आणि साखर आयुक्तालयाने कार्यवाही करावी, अशी सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे. ऊस गाळप आढावा आणि हंगाम नियोजनाबाबत पवार यांच्या अध्यक्षतेखाली काल मंत्री समितीची बैठक झाली; त्यावेळी ते बोलत होते.

एसटी

प्रवासी वाहतूक करीत असतांना महामंडळाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीनं  जास्तीत जास्त उत्पन्न आणणाऱ्या चालक आणि  वाहक यांना एसटीतर्फे रोख प्रोत्साहन भत्ता देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्येक फेरीचं  उत्पन्नाचं उद्‌दिष्ट देऊन ते उद्‌दिष्ट पूर्ण करुन अतिरिक्त उत्पन्न आणणाऱ्या चालक वाहकांना उद्‌दिष्टापेक्षा वाढीव उत्पन्नापैकी २० टक्के रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणून सम प्रमाणात वाटण्यात येणार आहे. सदर रक्कम त्यांची कामगिरी संपवून आगारात आल्यानंतर त्याच दिवशी रोख स्वरूपात मिळेल. प्रवासी तक्रार, प्रवाशांशी गैरवर्तणुक अथवा उत्पन्न वाढीसाठी अवैध मार्गाचा वापर केल्यास संबंधित चालक-वाहक यांना प्रोत्साहन भत्ता मिळणार नाही, असंही महामंडळाने स्पष्ट केलं आहे. त्यामुळे योग्य कामगिरी करणाऱ्या चालक-वाहकांना रोख स्वरुपात प्रोत्साहन भत्ता देऊन त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

स्वच्छता ही सेवा

केंद्र सरकारच्या 'स्वच्छता ही सेवा' या १७ सेप्टेंबर पासून सुरू झालेल्या स्वच्छता पंधरवड्यानिमित्त नागपूर महानगरपालिकेतर्फे आयोजित विविध उपक्रमाबाबत माहिती देण्यासाठी नागपूर महानगरपालिका आयुक्त आणि प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त आचल गोयल यांनी नागपूर आकाशवाणीशी संवाद साधला आहे .या संवादाचं प्रक्षेपण उद्या सकाळी ८ वाजून ४० मिनिटांनी  पावणे नऊ वाजता मध्यम लहरी 585 किलो हर्टस  वर ऐकता येऊ शकेल.

राष्ट्रीय लोक अदालत

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली आणि  महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या  निर्देशानुसार  जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नागपूरच्या वतीनं  दिनांक २८ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचं  आयोजन करण्यात आलं  आहे.  जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष  न्यायाधीश डी. पी. सुराणा यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या लोक अदालतीमध्ये नागपूर जिल्ह्यातील हजारो न्यायालयीन प्रलंबित आणि  दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली  आहेत. नागपूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे मागील चार वर्षांमध्ये

एकूण ६७ हजार ९६४ प्रलंबित आणि ४ लक्ष २० हजार ७५९ दाखलपूर्व प्रकरणे लोक अदालतीमध्ये निकाली काढण्यात आली आहेत.

सौर पंप

'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजना जाहीर झाल्यापासून विदर्भात केवळ तीन महिन्यात 3 हजार 541 शेतकऱ्यांच्या शेतात सौर कृषी पंप बसविण्यात आले असून 32 हजार 583 शेतकऱ्यांच्या अर्जावर काम सुरू आहे, अशी माहिती महावितरणच्या नागपुर प्रादेशिक विभागाचे प्रादेशिक संचालक परेश भागवत यांनी दिली. राज्य सरकारने यंदा 28 जून रोजी अर्थसंकल्पात 'मागेल त्याला सौर कृषी पंप' ही योजना शेतकऱ्यांसाठी जाहीर केली. त्यानुसार शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर पॅनेल्स, पंप असा संपूर्ण संच मिळतो. अनुसूचित जाती आणि जमातींच्या शेतकऱ्यांना पाच टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागतो. बाकी रक्कम केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडून अनुदान म्हणून मिळते. राज्यात एकूण 10 लाख सौर कृषी पंप बसविण्यात येणार असून या योजनेत विदर्भात 35 हजार 583 अर्ज महावितरणकडे प्राप्त झाले आहेत.

नक्षली ठार

गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेला लागून असलेल्या छत्तीसगड मधील नारायणपूर जिल्ह्यात काल दुपारी झालेल्या चकमकीत पोलिसांनी ३ नक्षल्यांना कंठस्नान घातले. यात दंडकारण्य झोनल समितीचा सदस्य रुपेश मडावी याचाही समावेश आहे. मडावी अहेरी तालुक्यातील देचलीपेठा पोलिस ठाण्यांतर्गत सिंदा गावचा रहिवासी होता. मागील २० वर्षांपासून तो गडचिरोली जिल्ह्यात सक्रिय होता. हत्या, खून आणि जाळपोळीचे ६६ गुन्हे त्याच्यावर दाखल होते. महाराष्ट्र शासनाने त्याच्यावर २५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलं होत.

दिव्या देशमुख

हंगेरीच्या बुडापेस्ट इथं बुद्धिबळ ओलंपियाड स्पर्धेत नुकतंच दुहेरी सुवर्णपदक पटकावून भारताच्या पुरुष आणि महिला संघानं इतिहास रचला आहे. भारतीय महिला संघात नागपूरच्या दिव्या देशमुख हिचा सामना निर्णायक ठरला. 18 वर्षीय दिव्यानं स्पर्धेतील सर्व 11 फेऱ्यांमधून सर्वाधिक नऊ पूर्णांक पाच गुणांची कमाई

करत वैयक्तिक सुवर्णपदकही पटकावलं आहे. अकरापैकी केवळ तीन लढतींमध्ये बरोबरी साधताना आठ सामने जिंकत भारताच्या विजयात दिव्याने निर्णायक भूमिका निभवली. याआधी 2022 मध्ये चेन्नई इथं झालेल्या बुद्धिबळ ओलंपियाड मध्ये तिनं कांस्यपदक जिंकलं होतं. सुवर्णपदक मिळवणाऱ्या भारतीय महिला संघात दिव्या देशमुख व्यतिरिक्त हरिका द्रोनावली, आर वैशाली, वंदिका अग्रवाल आणि तानिया सचदेव यांचा समावेश होता.

डॉ.शरद कळणावत

यवतमाळ इथले ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक, कामगार आणि शिक्षक संघटना नेते डॉ शरद कळणावत यांचं आज सकाळी निधन झालं. ते 90 वर्षांचे होते. शरद कळणावत यांनी नागपूर आणि अमरावती दोन्ही विद्यापीठांमध्ये कार्यकारी मंडळ आणि विद्वतसभा सदस्य, अधिष्ठाता, तसंच मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून जबाबदाऱ्या पार पाडल्या. अमरावती विद्यापीठाची पहिली डॉक्टरेट त्यांना मिळाली होती. उच्च शिक्षण क्षेत्रातला राज्य शासनाचा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार त्यांना मिळाला होता. नुटा या प्राध्यापक संघटनेचे आणि महाराष्ट्र प्राध्यापक संघटनेचे ते आधारस्तंभ होते.

हवामान

शुक्रवार दिनांक 27 सप्टेंबर पर्यंत विदर्भातील सर्व जिल्ह्यात दररोज कमी अधिक प्रमाणात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असल्यानं नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी केला आहे. दरम्यान, नागपुरात आज सकाळपासून अनेक ठिकाणी मुसळधार पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे दीर्घकाळ चाललेल्या उकाड्यापासून नागपूरकरांना दिलासा मिळाला. आज नागपूर, भंडारा, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली मध्ये मुसळधार पावसाची शक्यता असून उद्या पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ आणि पूर्व विदर्भातील गडचिरोली मध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. उद्या वाशिम जिल्ह्यात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

*****